Tel :- 022 22621620
E mail ID - dcpzoneport-mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ ०३
कार्यालय,
यलोगेट पोलीस ठाणे, पहिला माळा, सिंदुर ब्रिज जवळ,
पी.डी. मेलो रोड, मुंबई-४००००१

**जा.क्र.2169/पोउआ/दप ३/वा/२०२६** **दिनांक -०६/०७/२०२६**

**प्रति,**

मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

**विषय -** न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल.

**संदर्भ -** १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९
२) जा.क्र.४६८/पोउआ/प्रकटीकरण/गु.शा,गु.अ.वि/२०१६, दि.०६/०४/२०१६
३) जा.क्र. २९८८/बंप/वा/२०२५ , दि.१३/१२/२०२५

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, पोलीस उप-आयुक्त, दक्षिण परिमंडळ ०३ कार्यालयामध्ये शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल - १०, दि.१७/१०/२०१५ नुसार न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरुध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या तिमाही बैठकीचे VC द्वारे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता दक्षिण परिमंडळ मधील वडाळा, शिवडी आणि यलोगेट पोलीस ठाणचे पोलीस निरिक्षक (गुन्हे ), विधी अधिकारी, परिमंडळ ०१ (अतिरिक्त कार्यभार- दक्षिण परिमंडळ ०३),मुंबई हे सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये दक्षिण ०३ परिमंडळ अंतर्गत माहे एप्रिल ते जुन २०२६ या तीन महिन्याचे काळात दोषमुक्त झालेल्या ०२ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली आहे. त्याची माहिती सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे.

(विजयकांत सागर)
पोलीस उप आयुक्त,
दक्षिण परिमंडळ ०३,मुंबई.

**आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय** :- पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ, मुंबई **समितीच्या बैठकीचा दिनांक** :- दिनांक - ०६/०७/२०२६

| **अ. क्र.** | **प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण** | **प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल)** | **दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक** | **न्यायनिर्णयाचा दिनांक** | **न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे** | **खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे,** | **जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्या विरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सेशन कोर्ट केस क्र. ६०६/२०१९ | गु.र.क्र. ५७/०३, कलम १४३, १४७, १४९, ३३२, ३५३, ५०६, १४९ भा.दं.वि. | दि. १८/०८/२००३ | दि. २०/०५/२०२६ | १) साक्षीदारांनी सर्व आरोपींविरुध्द केवळ सर्वसाधारण आरोप केले. कोणत्या आरोपीने नेमके कोणते कृत्य केले याबाबत आरोपींच्या वैयक्तिक भुमिकेचा पुरावा नाही.<br>२) दिर्घ कालावधी लोटल्यामुळे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आरोपींना न्यायालयात ओळखु शकले नाहीत.<br>३) साक्षीदारांनी त्यांच्या साक्षीमध्ये न्यायालयात सांगीतलेल्या अनेक महत्वाच्या गोष्टी पोलीसांनी दिलेल्या मुळ जबाबात नव्हत्या. त्यामुळे साक्षीदारांची विश्वासार्हता कमी झाली.<br>४) जखमी फिर्यादी यांचे वैदयकीय कागदपत्रे सादर केली नाहीत.<br>५) गुन्हयाचे वेळी वापरलेले हत्यार चॉपर हस्तगत करण्यात आला नाही तसेच जप्त केलेले हत्यार दगड मा.न्यायालयात सादर करण्यात असमर्थ ठरले.<br>६) गुन्हा दाखल करताना लावलेले कलम ३०७ भा.दं.वि. काढुन टाकुन केवळ सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मौखिक सुचनेवरुन कलम ३३२ लावण्यात आले त्यामुळे तपासाची विश्वासार्हता कमी झाली. | **तपासी अधिकारी यांचे तपासातील उणीवा दिसुन येत आहेत.** | **गुन्हयाचे तपासी अधिकारी पो.नि.चाटे (सेवानिवृत्त ) यांचा मा. अपोआ दप्रावि,मुंबई यांना अहवाल सादर करण्यात आलेला आहे.** | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ७) गुन्हा घडताना सुमारे ५०० ते ६०० लोक हजर असताना देखील पोलीसांव्यतिरीक्त इतर कोणीही साक्षीदार नाही<br>८) यातील फिर्यादी तसेच साक्षीदार हे शासकीय कर्तव्यावर होते याबबात कोणताही पुरावा किंवा ठाणे दैनंदिनी सादर करण्यात आला नाही.<br>९) एफ.आय.आर. मध्ये खाडाखोड होती आणि त्यावर काउंटरसाईन नव्हते. तपासी अधिकारी यांना खाडाखोडीबाबत समाधान कारक उत्तर देता आलेले नाही.<br>१०) सदर गुन्हयातील मुख्य चार आरोपी हे मरण पावलेले आहेत.<br>**एकदंरीत तपासी अधिकारी यांचे तपासातील उणीवामुळे इतर आरोपीतांची निर्दोष मुक्तता झाल्याने दिसुन येत आहे.** | | | |
| ०२ | सेशन केस क्र. ८२४/२५ | शिवडी पोलीस ठाणे गु.र.क्र ९४/२०२० कलम ३०२ भादवि | दि. १६/०३/२०२१ | दि. ०६/०५/२०२६ | १) मा. सत्र न्यायालयाने आरोपीस प्रत्यक्षदर्शी साक्ष पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली.<br>२) आरोपीच्या कपडयावरील रक्त हे मयताचे आहे हे सिध्द झाले नाही.<br>३)सी सी टी व्ही फुटेज सिध्द झाले नाही.<br>४) आरोपी व फिर्यादी यांचा संबंध चांगले नाही याबाबत पुरावा नाही.<br>५) प्रमाणपत्र सादर करणारा यांच साक्ष ग्राहय मानली नाही.<br>**एकदंरीत प्रत्यक्षदर्शी साक्ष पुराव्या अभावी सदर गुन्हयामध्ये आरोपीतांची निर्दोष मुक्तता झाल्याने दिसुन येत आहे.** | नाही | नाही | |